नि.फौ.खटला क्र.११५/२०२०
सरकार / शुभम चव्हाण
निशाणी क्र.२६

साक्षीदार क्र.३ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – सागर सुभाष चव्हाण |
| वडिलांचे नाव | – सुभाष दत्तात्रय चव्हाण |
| वय | – २४ वर्षे |
| धंदा | – गवंडी काम |
| राहणार | – रा. आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. |

**<u>सरतपास सहा. सरकारी वकील श्रीमती ए. पी. केसकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१. माझ्या घरी माझी आई वडील व भाऊ असे असतात. पमा देवकर, अमोल देवकर व रणधीर देवकर हे माझे आजी आणि मामा असून ते माझ्या घराच्या शेजारी राहतात. सोमनाथ हा माझा मित्र आहे. घटना दिनांक २६/०६/२०२० रोजी घडलेली होती. त्या दिवशी सोमनाथ आणि मी प्रकाशवाडी येथील बँक ऑफ इंडीया येथील चौकात बसलो होतो. तिथे शुभम चव्हाण आला आणि त्याने आम्ही वाळूची गाडी धरुन दिली या संशयाच्या कारणावरुन मला व सोमनाथला हाणमार केली. रणधीर देवकर आले आणि त्यांनी शुभमच्या वडीलांकडे जाणेचे सांगितले. त्यानंतर मी, सोमनाथ गायकवाड व रणधीर देवकर असे आम्ही शुभम चव्हाण यांच्या घरी गेलो. शुभम यांच्या वडीलांशी बोलत असताना ते म्हणाले की, आम्हाला बोलायचा तुमचा काय संबंध. त्यावेळी आम्हाला शुभम चव्हाण, रोहित चव्हाण, विशाल चव्हाण आणि मधुकर चव्हाण यांनी काठीने मारहाण केली. रणधीर देवकर आणि मला डोक्यात मार लागला होता.

२. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेलो असता पोलीसांनी आम्हाला सरकारी दवाखान्यात जायला सांगितले. त्यानंतर रणधीर देवकर यांना सांगली सिव्हील हॉस्पीटल येथे उपचारासाठी नेण्यास सांगितले. त्यानंतर उपचार घेवून आल्यानंतर रणधीर देवकर यांनी आटपाडी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. याकामी पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला आहे. आजरोजी आरोपी क्र.१ व २ हजर आहेत. आरोपी क्र.३ याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. साक्षीदाराला आर्टीकल MO–1 to 3 वरील काठ्या दाखविण्यात आल्या. सदर काठ्या त्याच आहेत ज्यांनी आम्हाला मारहाण झाली होती.

**<u>मध्यान्हवेळ झाल्याने उलटतपास तहकूब</u>**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR Date: 2024.08.05 17:36:07 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)
दिनांक : ०५/०८/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी

**<u>मध्यान्ह वेळेनंतर उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.व्ही.पाठक यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

३. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे 'घटना दिनांक २६/०६/२०२० रोजी घडली होती' असे मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते. परंतु तसा मजकूर माझ्या पोलीसांसमोरील जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला वाचता येत नाही. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे 'शुभमच्या वडीलांकडे जाणेचे सांगितले' असे मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते. परंतु तसा मजकूर माझ्या पोलीसांसमोरील

जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे 'ते म्हणाले की, आम्हाला बोलायचा तुमचा काय संबंध' असे मी पोलीसांना जबाब देताना सांगितले होते. परंतु तसा मजकूर माझ्या पोलीसांसमोरील जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. ते म्हणाले की, आम्हाला बोलायचा तुमचा काय संबंध नाही की, घटना मी पाहिलेली नाही.

४. सुभाष हे माझे वडील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सोमनाथ गायकवाड हा माझा मित्र आहे. रणधीर हा माझा मामा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, सोमनाथ व रणधीर यांचे माझ्याकडे आणि माझे त्यांच्याकडे नेहमी येणेजाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, सोमनाथ व रणधीर हे मला व मी त्यांना मदत करण्यासाठी अडअडचणीला जात असतो.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेनंतर हिंडत फिरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेनंतर चालत बोलत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे घडलेल्या घटनेनंतर मी शुध्दीवर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मला कुठलीही रक्ताची जखम नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला टाके पडले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी दवाखान्यामध्ये ॲडमिट नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या म्हणण्याप्रमाणे झालेल्या घटनेची फिर्याद मला स्वतःला द्यायला कोणतीही अडचण नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्याला चालता येत नव्हते.

६. दिनांक २६/०६/२०२० रोजी मी दीड वाजणेच्या सुमारास दवाखान्यात पोहोचलो होतो. दिनांक २६/०६/२०२० रोजी मी तास दीड तास दवाखान्यात थांबलो होतो. दिनांक २६/०६/२०२० रोजी दवाखान्यात पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी माझ्यावर अर्ध्या तासाने उपचार सुरु केले. दवाखान्यात मी शुध्दीवर होतो. डॉक्टरांनी माझ्यावर दहा ते पंधरा मिनिटे उपचार केले.

७. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २६/०६/२०२० हा कोरोनाचा

कालावधी होता. हे म्हणणे खरे आहे की, कोरोनाच्या कालावधीमध्ये सरकारी प्रशासनाने सर्वांना आवाहन केले होते की, घरातून कोणी बाहेर पडू नका. हे म्हणणे खरे आहे की, घरातून कोणी बाहेर पडले तर पोलीस त्यांच्यावर केसेस करत होते. हे म्हणणे खरे आहे की, कोरोनाचे नियम मोडून आम्ही प्रकाशवाडीच्या चौकामध्ये बसलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांच्या गस्तीच्या गाड्या या प्रकाशवाडी मुख्य रस्त्यावरुन फिरत होत्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाशवाडीच्या चौकात बसल्यानंतर पोलीसांची गाडी आली आणि त्या भितीने आम्ही पळत सुटलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या कोरोनाच्या केसेस पडतील या भितीने पळत असताना पडून मला जखम झाली.

८. हे म्हणणे खरे आहे की, सुरेश इंडेन गॅसच्या पश्चिमेला तानाजी पाटील यांच्या श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुरेश इंडेनच्या पूर्व, पश्चिम व उत्तरेला लोकांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर कॉलेजच्या पूर्व दिशेला शेतजमिनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शेतजमिनीच्या उत्तरेला डाळींबाची बाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, मनोज चव्हाणचे घर प्रकाशवाडी येथील बालाजी मंदीर परिसरात आहे. मनोज चव्हाण शेळ्या राखतो किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, डाळींबाच्या रोपांना आधार द्यायला आर्टीकल MO-1 to 3 प्रमाणे काठ्या वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, डाळींबाच्या बागेजवळ आमचे घर आहे.

९. माझे वडील ट्रॅक्टरवर ड्रायव्हर म्हणून काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, मधुकर चव्हाण हे पायाने अपंग असून लंगडत चालतात. मला याची माहिती नाही की, विशाल व रोहित हे मजुरी करतात किंवा कसे. मला याची माहिती नाही की, रणधीर हा दत्ता पाटील पंच यांचे राजकीय काम करतो किंवा कसे. शुभम हा अनिल पाटील गटाचे काम करतो किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, लॉकडाऊनच्या काळामध्ये आम्ही पळत सुटलो असताना आम्हाला पडून झालेल्या जखमांचा गैरफायदा घेवून आम्ही आरोपींविरुध्द खोटी केस दाखल

केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात आरोपींच्या हिताविरुध्द सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.08.05 17:36:14 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ०५/०८/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****